| MHOS090004492015 | दाखल दिनांक | :- | २३/०२/२०१५ | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | :- | २३/०२/२०१५ | | |
| | निकाल दिनांक | :- | १६/०६/२०२६ | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ११ | ०३ | २४ |

**भाग अ**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(i) अन्वये]**

**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.३) कळंब, ता. कळंब,**

**जि. धाराशिव यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी - अमृता धोंडीराम जाधव)**

न्यायनिर्णय घोषित दिनांक १६/०६/२०२६

| | |
|---|---|
| नि. फौजदारी खटला क्र. २५/२०१५ | निशाणी क्र.१०९ |
| गुन्हा नोंदणी क्रमांक. १२५/२०१४ | पोलीस स्टेशन- शिराढोण |
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत - पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे शिराढोण,<br>ता. कळंब, जि. धाराशिव. |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | श्री. एस. टी. वैद्य |
| **विरुध्द** | |
| आरोपी | १. राजेश कचरु चव्हाण<br>वय ४५ वर्षे, व्यवसाय- मजुरी,<br>२. काकासाहेब कचरु चव्हाण<br>वय ३५ वर्षे, व्यवसाय- मजुरी,<br>३. अशोक दगडु पवार<br>वय ५० वर्षे, व्यवसाय- मजुरी |

| | |
|---|---|
| | ४. कृष्णा अशोक पवार<br>वय २२ वर्षे, व्यवसाय- मजुरी<br>५. धर्मराज अशोक पवार<br>वय २४ वर्षे, व्यवसाय- मजुरी<br>६. शशीकांत कचरु चव्हाण<br>वय ३३ वर्षे, व्यवसाय- मजुरी<br>सर्व रा. दत्तनगर, शिराढोण,<br>ता.कळंब, जि.उस्मानाबाद. |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | श्री. डी.एन. गोंड |

## भाग ब

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(ii)अन्वये]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २६/१२/२०१४ |
| गुन्हा दाखल दिनांक | २६/१२/२०१४ |
| दोषारोप दाखल दिनांक | २३/०२/२०१५ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०२/०४/२०२६ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १३/०६/२०१६ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | १६/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १६/०६/२०२६ |
| दोषी ठरवल्याचा दिनांक, जर असल्यास | -- |

**आरोपींची सविस्तर माहिती**

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनवर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | राजेश कचरु चव्हाण | २६/१२/१४ | २७/१२/१४ | १४३, १४८, ३२४, ३२३, | निर्दोष. | --- | --- |
| २) | काकासाहेब कचरु | २६/१२/१४ | २७/१२/१४ | | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | चव्हाण | | | ३३६, | | | |
| ३) | अशोक दगडु पवार | २६/१२/१४ | २७/१२/१४ | ५०४, ५०६ सह | | | |
| ४) | कृष्णा अशोक पवार | २६/१२/१४ | २७/१२/१४ | कलम १४९ आणि | | | |
| ५) | धर्मराज अशोक पवार | २६/१२/१४ | २७/१२/१४ | महाराष्ट्र पोलीस अधिनियम | | | |
| ६) | शशीकांत कचरु चव्हाण | २९/०१/१५ | २९/०१/१५ | कलम १३५ प्रमाणे | | | |

## भाग क

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्रमांक ४४(iii) अन्वये]**

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/आरोपीतर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार यांची यादी

### अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | चंद्रमणी गुणवंत नाईकवाडी | घटनास्थळ व जप्ती पंच | ३८ |
| २. | जब्बार जमीर खतीब | साक्षीदार | ८६ |
| ३. | राम किसन सोळंके | फिर्यादी | ९२ |
| ४. | शिवदत्त रामराव सोळंके | जखमी तथा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ९४ |
| ५. | विशाल मधुकर पवार | जखमी तथा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ९५ |

### ब. आरोपींतर्फे साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | निरंक | ---- | ---- |

## अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी

## अ. अभियोग पक्षाचा पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ३९/अ.सा.क्र.१ | घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील सहीस ओळखीपुरते. |
| २. | ९६ | घटनास्थळ पंचनामा/आरोपीतर्फे मान्य. |
| ३. | ९७ ते १०१ व १०८ | अटक पंचनामे/आरोपीतर्फे मान्य. |
| ४. | १०२ ते १०४ | वैद्यकीय प्रमाणपत्र/आरोपीतर्फे मान्य. |

## ब. आरोपींतर्फे पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ---- | निरंक |

## क. न्यायालयीन पुरावा

| अ. क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १. | ---- | निरंक |

## ड. मुद्देमाल

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | हातात मावतील एवढे लहान मोठे आकाराचे पाच दगड. |
| २. | -- | दिड ते दोन फुट लांबीच्या लहान मोठ्या आकाराच्या तीन ढलप्या. |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक १६ जुन,२०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (यानंतर संक्षिप्तपणे 'भा.दं.वि.' असे संबोधण्यात येत आहे) चे कलम १४३, १४८, ३२४, ३२३, ३३६, ५०४, ५०६ सह कलम १४९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत संपरीक्षा चालविण्यात आली आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे कीः-**

२. राम किसन सोळंखे (येथुन पुढे ''**फिर्यादी**'' संबोधण्यात येईल) यांनी दिनांक २६/१२/२०१४ रोजी शिराढोण पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली की, दिनांक २६/१२/२०१४ रोजी दुपारी ०१.०० वाजता ते कंदुरीच्या धार्मिक कार्यक्रमानिमीत्त शिराढोण येथील दर्ग्यात आले होते. अंदाजे ०६.०० वा. सुमारास सर्व आरोपी दर्ग्यात आले. आरोपी हे त्यांचे नातेवाईक असल्याने त्यांनी आरोपीस जेवण करण्यास विचारले असता, आरोपी क्र.१ याने त्यांना ''तु कंदुरी करतोस का ?'' असे वेडेवाकडे बोलुन ''तु माझ्या बायकोस नांदविण्यास पाठवित नाहीस?'' असे म्हणु लागला. तेव्हा त्यांनी आरोपी क्र.१ यास ''सदरबाबत मी काहीएक बोलु शकत नाही, कारण तुम्ही दोघेही माझे नातेवाईक आहात'' असे सांगत असताना आरोपी क्र.६ याने त्यांचा मुलगा जयदत्त यास चापट मारली. तेव्हा त्यांच्यासोबतचे नातेवाईक व महिला यांनी मध्यस्थी करुन भांडणतंटा करु नका असे म्हटले असता, आरोपी क्र.४ याने त्यांच्यासोबत असलेल्या विशाल पवार यास दगडाने मारुन जखमी केले. तेवढ्यात आरोपी क्र.१, २ व ६ यांनी त्यांना धरले व चापटाने तसेच, तेथेच पडलेल्या लाकडाने उचलुन मारहाण केली. तसेच, इतर आरोपी क्र.३ ते ५ हे ''यांना धरा, यांना खल्लास करा'' असे म्हणुन त्यांच्या महिला व नातेवाईकांवर दगडफेक करु लागले. त्यांच्या दगडफेकीत व मारहाणीत त्यांचा केज येथील नातेवाईक सचिन भिमा पवार यास आरोपी क्र.१ याने तेथेच पडलेल्या लाकडाच्या ढलपीने डोक्यात मारहाण केली. त्यामुळे सचिन गंभीर जखमी झाला.

आरोपी त्यांच्यावर जास्तच आक्रमकपणे मारहाण व दगडफेक करु लागल्याने दर्ग्याजवळील शिराढोण येथील जब्बार खतिब व गब्बार खतिब टेलर, किरण पाटील, कैलास पाटील, कलीम बागवान व गावातील इतर लोकांनी त्यांच्या भांडणाची सोडवासोडव केली. तेव्हापण आरोपी दगडफेक करीत होते. त्यांच्या दगडफेकीत त्यांना व त्यांच्या नातेवाईकांना व शिराढोण येथील मध्यस्थी झालेल्या लोकांना दगड लागुन जखमा झाल्या. सचिन पवार यास जास्तच मार लागल्याने त्यांनी त्यास उचलुन उपचाराकामी घेवुन गेले. त्यामुळे त्यांनी वरील आशयाची फिर्याद आरोपीविरुध्द दिली. सदर फिर्यादवरून आरोपींविरूध्द भा.दं.वि. चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ३३६, ३२३, ५०४, ५०६ सह कलम १४९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये गुन्हा क्र.१२५/२०१४ पोलीस ठाणे शिराढोण येथे नोंदविण्यात आला.

**३.** तपासादरम्यान तपासीक अंमलदार यांनी घटनेशी संबंधित असलेल्या साक्षीदारांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १६१ प्रमाणे जबाब नोंदविले. तसेच घटनास्थळाचा पंचनामा केला. तसेच, जखमींची वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत करुन तपासाअंती आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्यामुळे न्यायालयात दोषारोप-पत्र सादर केले.

**४.** दोषारोप-पत्र व त्यासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन करुन व आरोपींची बाजू ऐकून निशाणी क्र.२९ अन्वये आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम १४३, १४८, ३२४, ३२३, ३३६, ५०४, ५०६ सह कलम १४९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत दोषारोप निश्चित केला. उक्त दोषारोप आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला असता, त्यांनी तो अमान्य असल्याचे सांगून संपरीक्षेची मागणी केली.

**५.** अभियोग पक्षातर्फे आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी एकुण पाच साक्षीदारांना तपासण्यात आले. फिर्यादी यांनी निशाणी १०५ अन्वये पुरसीस देवुन त्यांना प्रकरणात पुढे लेखी अथवा तोंडी पुरावा देण्याचा नाही तसेच, प्रकरण पुढे

चालविण्याचे नाही असे कथन केले आहे. सदर पुरसीसच्या अनुषंगाने आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द दोषात्मक पुरावा न मिळून आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**६.** मी अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी अभियोक्ता श्री. एस.टी. वैद्य व आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. डी.एन. गोंड यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचे कथन साक्षीदारांचे जबाब दाखल झालेले दस्तऐवज आणि दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील मी माझे निष्कर्ष कारणेमिमांसासह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, आरोपींनी समान उद्दीष्ट साध्य करण्याकरीता दिनांक २६/१२/२०१४ रोजी १८.३० वा. च्या सुमारास मौजे शिराढोण येथील खाजा नसरोद्दीन दर्गा, शिराढोण, ता.कळंब, जि.उस्मानाबाद येथे फिर्यादी व साक्षीदार यांना दुखापत पोहोचविण्याच्या उद्देशाने बेकायदेशीर जमाव जमवून त्या बेकायदेशीर जमावाचे घटक झाले ? | नाही. |
| २. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवुन लाकडी ढलप्या आणि दगड यासारख्या शस्त्रानिशी दंगा केला ? | नाही. |
| ३. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी,वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | साक्षीदार यांना दगडाने व लाकडी ढलपीने मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली? | |
| ४. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदारांना लाथाबुक्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली ? | नाही. |
| ५. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून दगडफेक करुन मानवी जिवीतास धोका उत्पन्न होईल असे कृत्य केले ? | नाही. |
| ६. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदार यांचा शांतता भंग घडवून आणण्याचे उद्देशाने त्यांना शिवीगाळ करून अपमानीत केले व त्यांना प्रक्षोभित केले आणि अशा प्रक्षोभनामुळे त्यांचेकडून सार्वजनिक शांतता भंग व्हावा असा त्यामागे आरोपींचा हेतू होता ? | नाही. |
| ७. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदार यांना फौजदारीपात्र धाकदपटशा दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली? | नाही. |
| ८. | उपरोक्त दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी समान उद्दीष्ट साधण्याकरीता बेकायदेशीररीत्या एकत्र जमाव जमविला व ते बेकायदेशीर असल्याचे माहित असुन सुध्दा त्याचे घटक | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | झाले, व त्याद्वारे जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे अभियोग पक्षाने शाबित केले काय ? | |
| ९. | आदेश काय ? | आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ८ बाबतः-**

**७.** मुद्दा क्र. १ ते ८ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी ते चर्चेकरीता एकत्रित घेत आहे.

**८.** याठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे की, अभियोग पक्षाने आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम १४३, १४८, ३२४, ३२३, ३३६, ५०४, ५०६ सह कलम १४९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आला आहे. सदर दोषारोप वाजवी संशयापलिकडे जाउन सिध्द करण्याची जबाबदारी ही अभियोगपक्षाचीच आहे. आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोग पक्षाने पुढील गोष्टी प्रस्थापित करणे गरजेचे आहे.

१. आरोपींनी दर्ग्यात समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून त्या बेकायदेशीर जमावाचे घटक बनले.

२. आरोपींनी समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून शस्त्रानिशी दंगा केला.

३. आरोपींनी दर्ग्यात समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदारांना दगडाने व लाकडी ढलपीने मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली.

४. आरोपींनी दर्ग्यात समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून

फिर्यादी व साक्षीदारांना लाथाबुक्यांनी मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केली.

५. आरोपींनी दर्ग्यात समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून दगडफेक करुन मानवी जिवतास धोक्यात आणले.

६. आरोपींनी दर्ग्यात समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ करून त्यांचा उद्देशपूर्वक अपमान केला.

७. आरोपींनी दर्ग्यात समान उद्दीष्ट साधण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादी व त्याचे पत्नीस फौजदारीपात्र धाकपटशा दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली.

८. आरोपींनी दर्ग्यात समान उद्दीष्ट साधण्याकरीता बेकायदेशीररीत्या एकत्र जमाव जमविला व ते बेकायदेशीर असल्याचे माहित असुनसुव्यवसाया त्याचे घटक झाले, व त्याद्वारे जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन केले.

**९.** दोन्ही बाजुचा युक्तीवाद मी काळजीपूर्वक ग्रहण केला. अभिलेखावरील कागदपत्रे व पुराव्याचे मी बारकाईने अवलोकन केले.

**१०.** सरकार पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी राम किसन सोळंके (अ.सा.क्र.३, निशाणी ९२) यांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, आरोपींना नातेवाईक असल्यामुळे ते त्यांना ओळखतात. आरोपी व त्यांच्यामध्ये दहा वर्षापुर्वी घटना घडली होती. शिराढोण येथे खाजा दर्ग्यामध्ये कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमामध्ये काही घडले नव्हते. त्यांनी आरोपींविरुध्द फिर्याद दिली नव्हती. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान फिर्यादवरील सही त्यांची असल्याचे मान्य केले. परंतु, मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविलेली आहे.

**११.** सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा न्यायालयाच्या परवानगीने उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये त्यांनी मान्य केले आहे की, जीप गाडी पलटी झाल्यामुळे त्यांना दुखापत झाली

होती. तसेच, त्यांची व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. एकंदरीत सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास कुठलेही समर्थन अथवा कोणतीही कबुली दिलेली नाही.

१२. घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार चंद्रमणी गुणवंत नाईकवाडी (अ.सा.क्र.१, निशाणी क्रमांक ३८) यांनी त्यांच्या पुराव्यात शपथेवर असे कथन केले आहे की, दिनांक २७/१२/२०१४ रोजी त्यांच्यासमक्ष पोलीसांनी कोणताही पंचनामा केला नव्हता. त्यांच्या समक्ष कोणतीही जप्ती अगर कार्यवाही केली नाही. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे मान्य केले. परंतु, मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविलेली आहे.

१३. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा न्यायालयाच्या परवानगीने उलटतपास घेण्यात आला. तरीदेखील, सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास कुठलेही समर्थन अथवा कोणतीही कबुली दिलेली नाही.

१४. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार जब्बार जमीर खतीब (अ.सा.क्र.२, निशाणी क्रमांक ८६) यांनी त्यांच्या पुराव्यात शपथेवर असे कथन केले आहे की, ते आरोपी व फिर्यादीस ओळखत नाहीत. घटना ही दहा वर्षापुर्वी दिवस मावळल्यानंतर शिराढोण येथील दर्ग्यामध्ये घडली होती. ते दर्ग्याचा पुजारी होते. तेथे कंदुरीचा कार्यक्रम होता. घटनेदिवशी शुक्रवार होता. ते दर्गाच्या चौकटीत थांबले होते. त्यांनी कंदुरीच्या कार्यक्रमाकरीता आलेल्या लोकांचे भांडण पाहिले. तेथे मारामारी चालु होती. तेथे जवळपास तीस ते चाळीस माणसे असावीत. ते भांडण पाहुन लगेच घरी गेले. तसेच, आरोपींनी फिर्यादीस दगडाने व काठीने मारहाण करुन जखमी केल्याबाबत त्यांना माहीती नाही.

१५. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा न्यायालयाच्या परवानगीने उलटतपास घेण्यात आला.

तरीदेखील, सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास कुठलेही समर्थन अथवा कोणतीही कबुली दिलेली नाही.

१६. जखमी तथा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार शिवदत्त रामराव सोळंके (अ.सा.क्र.४, निशाणी क्रमांक ९४) यांनी त्यांच्या पुराव्यात शपथेवर असे कथन केले आहे की, फिर्यादी हे त्यांचे वडील आहेत. आरोपी क्र.१ ते ६ हे त्यांचे नातेवाईक आहेत. त्यांच्यामध्ये व आरोपीमध्ये कोणतीही घटना घडलेली नाही. पोलीसांनी त्यांच्याकडे विचारपुस केली नव्हती. पोलीसांनी केवळ त्यांची सही घेतली होती.

१७. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा न्यायालयाच्या परवानगीने उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये त्यांनी मान्य केले आहे की, त्यांची व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. एकंदरीत सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास कुठलेही समर्थन अथवा कोणतीही कबुली दिलेली नाही.

१८. जखमी तथा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार विशाल मधुकर पवार (अ.सा.क्र.५, निशाणी क्रमांक ९५) यांनी त्यांच्या पुराव्यात शपथेवर असे कथन केले आहे की, फिर्यादी हे त्यांचे नातेवाईक आहेत. ते आरोपींना ओळखत नाहीत. आरोपी व त्यांच्यामध्ये कोणतीही घटना झाली नव्हती. पोलीसांनी त्यांचा जबाब घेतला नव्हता. पोलीसांनी त्यांची एक सही घेतली होती.

१९. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदाराचा न्यायालयाच्या परवानगीने उलटतपास घेण्यात आला. त्यामध्ये त्यांनी मान्य केले आहे की, त्यांची व आरोपींची न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. एकंदरीत सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाच्या कथनास कुठलेही समर्थन अथवा कोणतीही कबुली दिलेली नाही.

२०. अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत प्रकरणात आरोपींनी घटनास्थळ पंचनामा, अटक पंचनामे व वैद्यकीय प्रमाणपत्र कबुल करुन त्याबाबत वाद

घातलेला नाही.

**२१.** आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करणेकामी फिर्यादी राम याने फिर्यादप्रमाणे कथन करणे आवश्यक आहे. परंतु, फिर्यादीने फिर्यादप्रमाणे कथन केलेले नाही. त्यामुळे, फिर्याद सिध्द होवु शकत नाही. तसेच, घटनेतील प्रत्यक्षदर्शी तथा जखमी साक्षीदार शिवदत्त आणि विशाल यांनी घटना स्पष्पणे नाकारलेली आहे. तसेच, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार जब्बार यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान त्यांनी कंदुरीच्या कार्यक्रमाकरीता आलेल्या लोकांचे भांडण पाहिल्याचे तसेच, तेथे मारामारी चालु होती असे कथन केले असले तरी, ते कोण कोणास मारत होते याबाबत स्पष्टपणे कथन करत नाहीत. सदरील साक्षीदाराची कथने ही मोघमस्वरुपाची असल्यामुळे ती विश्वासार्ह वाटत नाहीत.

२२. तसेच, अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला घटनास्थळ व जप्ती पंच साक्षीदार चंद्रमणी यांनी अभियोग पक्षाच्या कथनास सहकार्य केलेले नसल्यामुळे घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द होवु शकत नाही. अशा परिस्थितीत सदर परिस्थितीजन्य पुराव्यातून कोणताही फायदा अभियोग पक्षास होणार नाही. आरोपींनी वैदयकीय प्रमाणपत्र कबुल केले असले तरी, फिर्यादीच्या कथनांनुसार ते जीप गाडी पलटी झाल्यामुळे जखमी झाले होते. त्यामुळे वैद्यकीय प्रमाणपत्रात नमुद जखमा ह्या आरोपींनी केलेल्या मारहाणीत झाल्या ही बाब सिध्द करणेकामी अभियोग पक्षास अपयश आले आहे.

**२३.** थोडक्यात अभियोग पक्षाने तपासलेले फिर्यादी, प्रत्यक्षदर्शी आणि जखमी तथा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हे प्रस्तुत प्रकरणातील महत्त्वाचे साक्षीदार असताना सुध्दा त्यांनी तथाकथीत घटनेबाबत कोणतेही कथन केलेले नाही. अशा परिस्थितीत फिर्यादी यांना आरोपींनी मारहाण केली याबाबत कोणताही स्पष्ट पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे माझ्या मते भा.दं.वि. चे कलम १४३, १४८, ३२४, ३२३, ३३६, ५०४, ५०६ सह कलम १४९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ प्रमाणे आरोपींवर दोषसिध्दीसाठी आवश्यक असणारे महत्वाचे घटक अभियोगपक्षाने वाजवी

संशयापलीकडे जाउन सिध्द केलेले नाहीत.

**२४.** अशा परिस्थितीत, अभियोग पक्ष आरोपींविरुध्दचा दोषारोप सिध्द करण्यास पुर्णपणे अपयशी ठरला आहे असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींविरुध्द लावण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्याइतपत आवश्यक घटक/पुरावा अभिलेखावर नसल्यामुळे आरोपींची मुक्तता करणे योग्य होईल. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ८ चा निष्कर्ष हा नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ९ बाबतः-</u>**

**२५.** मुद्दा क्र. १ ते ८ च्या निष्कर्ष प्राप्तीनुसार भा.दं.वि. चे कलम १४३, १४८, ३२४, ३२३, ३३६, ५०४, ५०६ सह कलम १४९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र अपराध आरोपींविरुध्द सिध्द करण्यास अभियोग पक्ष पूर्णपणे अपयशी ठरला आहे. त्यामुळे वरील सर्व पुराव्याच्या विश्लेषणावरुन माझ्या मते आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. परिणामी, मुद्दा क्रमांक १० च्या अनुषंगाने मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ राजेश कचरु चव्हाण, २. काकासाहेब कचरु चव्हाण, ३. अशोक दगडु पवार, ४. कृष्णा अशोक पवार, ५. धर्मराज अशोक पवार व ६. शशीकांत कचरु चव्हाण सर्व रा. दत्तनगर, शिराढोण, ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांची भारतीय दंड विधानचे कलम १४३, १४८, ३२४, ३२३, ३३६, ५०४, ५०६ सह कलम १४९ आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांमधून फौजदारी प्रकिया संहिता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | आरोपींचे वैयक्तीक जातमुचलके व जामीनकतबे रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | जप्त मुद्देमालापैकी हातात मावतील एवढे लहान मोठे आकाराचे पाच दगड हे मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट |

| | |
|---|---|
| | करण्यात यावेत. |
| ४. | जप्त मुद्देमालापैकी दिड ते दोन फुट लांबीच्या लहान मोठ्या आकाराच्या तीन ढलप्या या मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात याव्यात. |
| ५. | आरोपींनी फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७-अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चे वैयक्तीक जातमुचलके द्यावेत. |

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

**स्वाक्षरीत/-**
(**अमृता धोंडीराम जाधव**)
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग
कळंब (न्यायालय क्र.३)

दिनांकः १६/०६/२०२६
ठिकाणः- कळंब

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per the original judgment.

| | |
|---|---|
| Name of Stenographer | Shri. Prashant Sunita S. Ovhal,<br>Stenographer-III |
| Court | 3rd Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Kallam |
| Date | 16/06/2026 |
| Order signed by the<br>Presiding officer on | 16/06/2026 |
| Order uploaded on | 16/06/2026 |